Prepp

Practice, Learn and Achieve Your Goal with Prepp

# UGC NET Exam

Marathi

Simplifying
**Government Exams**

SSC CHSL | IAS EXAM | RRB NTPC | NTSE | CDS
SSC CGL | CBSE UGC NET | IBPS PO | NDA
SBI PO | IBPS CLERK | AFCAT | SSC JE | CTET
CSIR UGC NET | CAPF | IBPS RRB

www.prepp.in

# PAPER-II
# MARATHI

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ____________________________
   (Name) ______________________________
2. (Signature) ____________________________
   (Name) ______________________________

OMR Sheet No. : ..............................................
(To be filled by the Candidate)

Roll No. | | | | | | | | |
(In figures as per admission card)

Roll No.____________________________________
(In words)

**D 3 8 1 1**

Time : 1 $^{1}/_{4}$ hours]  [Maximum Marks : **100**

Number of Pages in this Booklet : **8**  Number of Questions in this Booklet : **50**

## Instructions for the Candidates

1. Write your roll number in the space provided on the top of this page.
2. This paper consists of fifty multiple-choice type of questions.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to you. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as below :
   (i) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal and do not accept an open booklet.
   (ii) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to pages/questions missing or duplicate or not in serial order or any other discrepancy should be got replaced immediately by a correct booklet from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given.**
   (iii) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each item has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the oval as indicated below on the correct response against each item.
   **Example :** (A) (B) ● (D)
   where (C) is the correct response.
5. Your responses to the items are to be indicated in the **Answer Sheet given inside the Paper I Booklet only.** If you mark at any place other than in the ovals in the Answer Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done in the end of this booklet.
8. If you write your Name, Roll Number, Phone Number or put any mark on any part of the Answer Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return the test question booklet and OMR Answer sheet to the invigilators at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table etc., is prohibited.**
12. **There is no negative marks for incorrect answers.**

## परीक्षार्थियों के लिए निर्देश

1. पहले पृष्ठ के ऊपर नियत स्थान पर अपना रोल नम्बर लिखिए ।
2. इस प्रश्न-पत्र में पचास बहुविकल्पीय प्रश्न हैं ।
3. परीक्षा प्रारम्भ होने पर, प्रश्न-पुस्तिका आपको दे दी जायेगी । पहले पाँच मिनट आपको प्रश्न-पुस्तिका खोलने तथा उसकी निम्नलिखित जाँच के लिए दिये जायेंगे, जिसकी जाँच आपको अवश्य करनी है :
   (i) प्रश्न-पुस्तिका खोलने के लिए उसके कवर पेज पर लगी कागज की सील को फाड़ लें । खुली हुई या बिना स्टीकर-सील की पुस्तिका स्वीकार न करें ।
   (ii) **कवर पृष्ठ पर छपे निर्देशानुसार प्रश्न-पुस्तिका के पृष्ठ तथा प्रश्नों की संख्या को अच्छी तरह चैक कर लें कि ये पूरे हैं । दोषपूर्ण पुस्तिका जिनमें पृष्ठ/प्रश्न कम हों या दुबारा आ गये हों या सीरियल में न हों अर्थात् किसी भी प्रकार की त्रुटिपूर्ण पुस्तिका स्वीकार न करें तथा उसी समय उसे लौटाकर उसके स्थान पर दूसरी सही प्रश्न-पुस्तिका ले लें । इसके लिए आपको पाँच मिनट दिये जायेंगे । उसके बाद न तो आपकी प्रश्न-पुस्तिका वापस ली जायेगी और न ही आपको अतिरिक्त समय दिया जायेगा ।**
   (iii) इस जाँच के बाद OMR पत्रक की क्रम संख्या इस प्रश्न-पुस्तिका पर अंकित कर दें ।
4. प्रत्येक प्रश्न के लिए चार उत्तर विकल्प (A), (B), (C) तथा (D) दिये गये हैं । आपको सही उत्तर के दीर्घवृत्त को पेन से भरकर काला करना है जैसा कि नीचे दिखाया गया है ।
   **उदाहरण :** (A) (B) ● (D)
   जबकि (C) सही उत्तर है ।
5. प्रश्नों के उत्तर **केवल प्रश्न पत्र I के अन्दर दिये गये उत्तर-पत्रक पर ही** अंकित करने हैं । यदि आप उत्तर पत्रक पर दिये गये दीर्घवृत्त के अलावा किसी अन्य स्थान पर उत्तर चिह्नांकित करते हैं, तो उसका मूल्यांकन नहीं होगा ।
6. अन्दर दिये गये निर्देशों को ध्यानपूर्वक पढ़ें ।
7. कच्चा काम (Rough Work) इस पुस्तिका के अन्तिम पृष्ठ पर करें ।
8. यदि आप उत्तर-पुस्तिका पर नियत स्थान के अलावा अपना नाम, रोल नम्बर, फोन नम्बर या कोई भी ऐसा चिह्न जिससे आपकी पहचान हो सके, अंकित करते हैं अथवा अभद्र भाषा का प्रयोग करते हैं, या कोई अन्य अनुचित साधन का प्रयोग करते हैं, तो परीक्षा के लिये अयोग्य घोषित किये जा सकते हैं ।
9. आपको परीक्षा समाप्त होने पर प्रश्न-पुस्तिका एवं OMR उत्तर-पत्रक निरीक्षक महोदय को लौटाना आवश्यक है और परीक्षा समाप्ति के बाद उसे अपने साथ परीक्षा भवन से बाहर न लेकर जायें ।
10. **केवल नीले/काले बाल प्वाईंट पेन का ही इस्तेमाल करें ।**
11. **किसी भी प्रकार का संगणक (कैलकुलेटर) या लाग टेबल आदि का प्रयोग वर्जित है ।**
12. **गलत उत्तरों के लिए कोई अंक काटे नहीं जाएँगे ।**



Latest Sarkari Jobs, Govt Exam Results, Vacancies and updates on one click
Know More

# MARATHI
# मराठी
## Paper – II
## प्रश्नपत्रिका – II

**Note :** This paper contains **fifty (50)** objective type questions, each question carrying **two (2)** marks. Attempt **all** the questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **पन्नास** (50) बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन** (2) गुण आहेत. **सर्व** प्रश्नांची उत्तरे लिहा.

**1.** आळंदी येथील स्मारक शिलालेख कोणत्या शकातील आहे ?

(A) शके ११११ (B) शके ९८२
(C) शके १०७९ (D) शके ११३९

**2.** मराठी भाषा इण्डो – युरोपिअन भाषाकुलाच्या कोणत्या शाखेतील आहे ?

(A) आर्मिनिअन
(B) ग्रीक अथवा हेलेनिक
(C) इटालिक
(D) इण्डो-इरानिअन

**3.** 'तुझ्या प्रीतीचे दु:ख मला दाऊ नको रे ।
वधून जाई प्राण घेई जगी ठेवू नको रे ।।'
ही काव्यपंक्ती कोणाची ?

(A) अनंतफंदी (B) परशराम
(C) होंनाजी बाळा (D) राम जोशी

**4.** बिकट वाट वहिवाट नसावी धोपटमार्गा सोडू नको । संसारामधि ऐस आपला उगाच भटकत फिरू नको

(A) अनंतफंदी (B) राम जोशी
(C) निरंजन माधव (D) कृष्णदयार्णव

**5.** 'पतितपावन नाव ऐकूनी आलो मी द्वारा ।
पतितपावन नव्हेसी म्हणून जातो माघारा ।।' ही काव्यपंक्ती कोणाची ?

(A) सावता माळी
(B) गोरा कुंभार
(C) नामदेव
(D) तुकाराम

**6.** पुढीलपैकी कोणते काव्य रामदासांचे आहे ?

(A) उखाहरण
(B) भावार्थ रामायण
(C) वनसुधा
(D) अस्मानी सुलतानी

**7.** पुढीलपैकी कोणती बखर शिवचरित्र पर नाही ?

(A) एक्याण्णव कलमी बखर
(B) सभासदाची बखर
(C) हरिवंशाची बखर
(D) सपृप्रकरणात्मक चरित्र

**8.** भिन्न वा व्यवच्छेदक स्वनांना म्हणजे स्वनिमांना स्वत:चा अर्थ नसतो तर भाषिक रचनेच्या स्तरावरील मूलघटकाला म्हणजे पदिमाला (morpheme) स्वत:चा अर्थ असतो.

(A) केवळ पूर्वार्ध योग्य आहे.
(B) केवळ उत्तरार्ध योग्य आहे.
(C) संपूर्ण विधान योग्य आहे.
(D) संपूर्ण विधान अयोग्य आहे.

**9.** चक्र > चक्क, भक्त > भत्त, मुक्त > मुक्क, पक्व > पक्क ही कोणत्या प्रकारच्या स्वन परिवर्तनाची उदाहरणे आहेत ?

(A) सदृशीकरण
(B) विसदृशीकरण
(C) रचन व्यत्यास
(D) सदृशस्वनलोप



Latest Sarkari Jobs, Govt Exam Results, Vacancies and updates on one click
Know More

**10.** एखादा शब्द जेव्हा आपल्या जुन्या भाषिक संदर्भांचा त्याग करून संपूर्णपणे नव्या भाषिक संदर्भात वापरला जाऊ लागतो, तेव्हा अर्थपरिवर्तनाची कोणती प्रक्रिया घडते ?

(A) अर्थविस्तार (B) अर्थान्तर
(C) अर्थसंकोच (D) वस्तुरूपान्तर

**11.** राजवाडा, गायरान, कृष्णसर्प हे शब्द कोणत्या रचनेची उदाहरणे आहेत ?

(A) बाह्यपदप्रधान रचना
(B) क्रियापदबंध
(C) अन्त:पदप्रधान रचना
(D) क्रियाविशेषण पदबंध

**12.** एखाद्या भाषेत एकरूप श्रवणप्रत्यय देणाऱ्या, आंशिक उच्चारसाम्य असलेल्या व अर्थभेदक क्षमता नसलेल्या स्वनांतरांचा वर्ग म्हणजे काय ?

(A) रूपिम (B) स्वनिम
(C) नासिक्यरंजन (D) स्वैर विनियोग

**13.** घरगुती, हातखंडा, पांढराफटक, सरळसोट या शब्दांतील गुती, खंडा, फटक, सोट यांना काय म्हणतात ?

(A) अनन्य साधारण रूपिम
(B) कार्यकर रूपिम
(C) शून्य रूपिकांतर
(D) पदस्वनिमिकी

**14.** 'तू मला पुस्तक दिलेस', या वाक्यातील प्रयोग कोणता ?

(A) भावे प्रयोग
(B) कर्तृ-कर्मसंकर
(C) कर्म-भावसंकर
(D) भावकर्तरी

**15.** झाड, दगड, घोडा, डोके हे शब्द कोणते आहेत ?

(A) तत्सम
(B) तद्भव
(C) देशी
(D) परभाषीय

**16.** बडबड, किरकिर, कडकडाट, फडफड या शब्दांना काय म्हणतात ?

(A) अनुकरणवाचक
(B) अंशाभ्यस्त शब्द
(C) पूर्णाभ्यस्त शब्द
(D) प्रत्ययघटित शब्द

**17.** खर्च हा शब्द कोणत्या भाषेतून मराठीत आला ?

(A) उर्दू (B) फार्सी
(C) अरबी (D) तुर्की

**18.** दिलगीर हा शब्द कोणत्या भाषेतून मराठीत आला ?

(A) हिंदी (B) उर्दू
(C) अरबी (D) फार्सी

**19.** पुढील नाटके कालक्रमानुसार लावा :
'तो मी नव्हेच', 'तुझे आहे तुजपाशी', 'संध्या छाया', 'एक शून्य बाजीराव'

(A) 'एक शून्य बाजीराव', 'तुझे आहे तुजपाशी', 'संध्या छाया', 'तो मी नव्हेच'
(B) 'तो मी नव्हेच', 'तुझे आहे तुजपाशी', 'एक शून्य बाजीराव', 'संध्या छाया'
(C) 'संध्या छाया', 'तो मी नव्हेच', 'तुझे आहे तुजपाशी', 'एक शून्य बाजीराव'
(D) 'तुझे आहे तुजपाशी', 'तो मी नव्हेच', 'एक शून्य बाजीराव', 'संध्या छाया'

**20.** निबंधकार व निबंध यांच्या जोड्या लावा :

| | |
|---|---|
| 1. 'गुलामगिरी' | 5. का.बा. मराठे |
| 2. 'सुखदायक राज्य प्रकरणी निबंध' | 6. विष्णुशास्त्री चिपळूणकर |
| 3. 'आमच्या देशाची स्थिती' | 7. जोतीराव फुले |
| 4. 'नावल व नाटक यां विषयी निबंध' | 8. विष्णु बुवा ब्रह्मचारी |
| | 9. लोकहितवादी |

(A) 1-7, 2-8, 3-6, 4-5
(B) 1-9, 2-7, 3-5, 4-6
(C) 1-6, 2-9, 3-7, 4-5
(D) 1-8, 2-6, 3-9, 4-7



Latest Sarkari Jobs, Govt Exam Results, Vacancies and updates on one click
Know More

**21.** वृत्तपत्र व पत्रकार यांच्या जोड्या लावा :

| | |
|---|---|
| 1. 'दर्पण' | 5. डॉ. बाबासाहेब आंबेडकर |
| 2. 'प्रभाकर' | 6. बाळशास्त्री जांभेकर |
| 3. 'संदेश' | 7. भाऊ महाजन |
| 4. मूकनायक' | 8. अ.ब. कोल्हटकर |
| | 9. चिं.वि. वैद्य |

(A) 1-6, 2-9, 3-7, 4-5
(B) 1-9. 2-7, 3-5, 4-6
(C) 1-6, 2-7, 3-8, 4-5
(D) 1-8, 2-6, 3-9, 4-7

**22.** कादंबरी व कादंबरीकार यांच्या जोड्या लावा :

| | |
|---|---|
| 1. 'वज्राघात' | 5. रघुवीर सामंत |
| 2. 'रागिणी' | 6. ना.सी. फडके |
| 3. 'हिंदोळ्यावर' | 7. वा.म. जोशी |
| 4. 'उपकारी माणसे' | 8. ह.ना. आपटे |
| | 9. विभावरी शिरुरकर |

(A) 1-6, 2-9, 3-7, 4-5
(B) 1-9, 2-7, 3-5, 4-6
(C) 1-6, 2-7, 3-8, 4-9
(D) 1-8, 2-7, 3-9, 4-5

**23.** कोश व कोशकार यांच्या जोड्या लावा :

| | |
|---|---|
| 1. 'महाराष्ट्रीय ज्ञानकोश' | 5. दे.द. वाडेकर |
| 2. 'मराठी तत्त्वज्ञानकोश' | 6. मा.त्र्यं. पटवर्धन |
| 3. 'भारतीय समाजविज्ञानकोश' | 7. श्री.व्यं. केतकर |
| 4. 'फारशी-मराठी कोश' | 8. स.मा. गर्गे |
| | 9. वि.वा. भिडे |

(A) 1-6, 2-9, 3-7, 4-5
(B) 1-7, 2-5, 3-8, 4-6
(C) 1-6, 2-7, 3-8, 4-9
(D) 1-8, 2-7, 3-9, 4-5

**24.** पुढीलपैकी कोणत्या धर्मग्रंथाचा मराठीत अनुवाद झालेला नाही ?

(A) 'श्रीमद्‌भगवद्‌गीता'
(B) 'बायबल'
(C) 'कुराण'
(D) 'गुरु ग्रंथसाहेब'

**25.** दोस्तोव्हस्कीच्या 'क्राईम ॲण्ड पनिशमेण्ट' या कादंबरीच्या अनुवादाचे शीर्षक काय आहे ?

(A) 'गुन्हा आणि सजा'
(B) 'अपराध आणि शिक्षा'
(C) 'देव जागा आहे'
(D) 'पुन्हा उजाडेल'

**26.** 'मेघदूत' या कालिदासाच्या काव्याचा मराठीत अनुवाद वामन पंडित, रा.चिं. श्रीखंडे, कुसुमाग्रज आणि बा.भ. बोरकर या कवीनी केलेला आहे :

(A) वरील पैकी एक नाव चुकीचे आहे.
(B) वरील पैकी सर्व नावे बरोबर आहेत.
(C) वरील पैकी दोन नावे चुकीची आहेत.
(D) या काव्याचा मराठीत अनुवादच झाला नाही.

**27.** 'वाक्यं रसात्मकं काव्यम्' हे साहित्याचे स्वरूप-लक्षण पुढीलपैकी कोणत्या ग्रंथात सांगितले आहे ?

(A) 'साहित्यदर्पण' (B) 'रसगंगाधर'
(C) 'हृदय दर्पण' (D) 'काव्यमीमांसा'

**28.** वर्डस्वर्थने 'भावनांचा उत्स्फूर्त उद्रेक म्हणजे काव्य' असे वर्णन करताना त्या उद्रेकाविषयी आणखी काय म्हटले आहे ?

(A) अनावर
(B) मनात खळबळ माजवणारा
(C) बेभान
(D) मनाच्या शांत अवस्थेत पुन्हा आठवलेला

**29.** "अनौचित्याखेरीज दुसरे कोणतेही रसभंगाचे कारण नाही", असा विचार क्षेमेन्द्राने मांडला आणि अभिनवगुप्ताने रसविघ्नांची चर्चा करताना त्याचे समर्थन केले."

(A) वरील विधान संपूर्ण बरोबर आहे.
(B) वरील विधानतील पूर्वार्ध बरोबर, पण उत्तरार्ध चूक.
(C) वरील विधानातील पूर्वार्ध चूक, पण उत्तरार्ध बरोबर.
(D) वरील विधान संपूर्णतः चुकीचे आहे.



Latest Sarkari Jobs, Govt Exam Results, Vacancies and updates on one click
Know More

**30.** पुढील साहित्य संप्रदायांच्या उदयाची कालानुक्रमाने मांडणी करा :

१. रोमॅण्टिसिझम

२. फेमिनिझम

३. क्लासिसिझम

४. देशीवाद

(A) ४, २, ३, १

(B) २, ४, १, ३

(C) १, ३, ४, २

(D) ३, १, २, ४

**31.** रससंख्येबाबत पुढीलपैकी कोणती भूमिका लोल्लटाने घेतली होती ?

(A) रस आठच मानले पाहिजेत.

(B) रस तत्त्वतः अनंत आहेत.

(C) रस नऊ आहेत.

(D) खरा रस एकच आहे.

**32.** संस्कृत साहित्यशास्त्रातील रसचर्चेला 'एक अडगळ' असे कोणी संबोधले ?

(A) गंगाधर गाडगीळ

(B) भालचन्द्र नेमाडे

(C) म.सु. पाटील

(D) गंगाधर पाटील

**33.** पुढील पैकी कोणती पुस्तके माधव आचवल यांनी लिहिलेली आहेत ?

(A) 'रसास्वाद' आणि 'जास्वंद'

(B) 'खडक आणि पाणी' आणि 'साहित्याचे मानदंड'

(C) 'रूपवेध' आणि 'माती आणि मूर्ती'

(D) 'धार आणि काठ' आणि 'छांदसी'

**34.** 'काव्यभाषाहीविरोधाभासात्मक (paradoxical) असते', असे प्रतिपादन कोणी केले आहे ?

(A) मिडलटन मरे

(B) आय.ए. रिचर्ड्स

(C) क्लिअंत ब्रुक

(D) जॉर्ज सँटायना

**35.** चांगल्या पत्रलेखनासाठी आवश्यक असणाऱ्या पुढील घटकांचा क्रम त्यांच्या महत्त्वानुसार ठरवा :

१. कागदाची निवड

२. दृष्टीला सुखद वाटणारी मांडणी

३. पत्रातील भाषा

४. मायना

(A) ३, ४, २, १

(B) ४, १, ३, २

(C) १, २, ४, ३

(D) २, ३, १, ४

**36.** बातमीच्या मथळ्याचे सर्वांत महत्त्वाचे गुणवैशिष्ट्य कोणते ?

(A) लक्षवेधकपणा

(B) अलंकारिकता

(C) भाषासौंदर्य

(D) विषय मांडणी

**37.** जाहिरातीच्या मसुद्याचे सर्वांत महत्त्वाचे गुणवैशिष्ट्य कोणते ?

(A) कमीत कमी शब्दांत जास्तीत जास्त आशय

(B) अलंकारिक भाषाशैली व नादमयता

(C) भावनिकतेचे प्रदर्शन

(D) भरघोस आश्वासने

**38.** जैसी पुस्पामाजि पुस्पमोगरी । कि परिमळामाजि कस्तुरि । तैसी भासांमाजि साजिरी । मराठिया ।। - ही रचना कोणाची ?

(A) नरेन्द्र

(B) रामदास

(C) फादर थॉमस स्टीफन्स

(D) पाद्री क्रुवा

**39.** 'रसचर्चा' हा ग्रंथ कोणी लिहिला ?

(A) पद्माकर दादेगावकर

(B) र.पं. कंगले

(C) ग.त्र्यं. देशपांडे

(D) मालती बेडेकर



Latest Sarkari Jobs, Govt Exam Results, Vacancies and updates on one click
Know More

**40.** पुढील पैकी कोणी स्त्री-वादाचे समर्थन करणारे लेखन केले नाही ?

(A) इंदिरा संत

(B) अश्विनी धोंगडे

(C) शोभा नाईक

(D) छाया दातार

**41.** पुढील ग्रंथांची नावे कालक्रमानुसार लिहा :

a. 'लीळाचरित्र'

b. 'रुक्मिणी स्वयंवर'

c. 'सह्याद्रिवर्णन'

d. 'स्मृतिस्थळ'

(A) a, b, c, d

(B) b, a, d, c

(C) a, b, d, c

(D) a, d, b, c

**42.** पुढील पैकी कोणता ग्रंथ शाहिरी वाङ्मय संबंधीचा आहे ?

(A) 'तोच चंद्रमा' (B) 'पैंजण'

(C) 'दोला' (D) 'लावण्यवेल'

**43.** 'निळी पहाट' हा दलित साहित्याची समीक्षा करणारा ग्रंथ कोणी लिहिला ?

(A) राजा ढाले

(B) रा.ग. जाधव

(C) यशवंत मनोहर

(D) बाबुराव बागूल

**44.** पुढील पैकी कोणती व्यक्ती दलित लेखिका म्हणून ओळखली जात नाही ?

(A) ज्योती लांजेवार

(B) ऊर्मिला पवार

(C) प्रज्ञा दया पवार

(D) इंदुमती जोंधळे

**45.** पुढील पैकी कोणता शब्द शुद्धलेखन विषयक नियमास अनुसरून लिहिला आहे ?

(A) सद् सद् विवेक बुद्धी

(B) सद सद् विवेक बुद्धी

(C) सद् सद विवेक बुद्धी

(D) सद सद विवेक बुद्धी

पुढील उतारा वाचा व त्याच्या संदर्भातील प्रश्नांची उत्तरे लिहा :

काव्याच्या वाचनापासून राजापासून रंकांस, तत्त्ववेत्त्यापासून अत्यंत अल्पशिक्षित मनुष्यास, सर्व स्थितींत आनंद होण्यास अनेक कारणे आहेत. एक तर कवींच्या वाणींतून जे बोल निघत असतात, त्यांच्या सत्यतेविषयी प्रत्येक अंत:करण साक्षदेत असते. जी सत्ये देशकालादिकांनी मर्यादित, किंवा जी सत्ये बहुश्रुतांस मात्र समजणार, अशी सत्ये कवी कधीच सांगत बसत नाही. ज्या मनुष्याची रानटी अवस्था सुटली आहे, ज्याला मानवी स्वभावाचे किंचित ज्ञान प्राप्त झाले आहे, ज्याच्या मनावर बाह्य सृष्टीच्या सौंदर्याचा परिणाम होउ लागला आहे, असा मनुष्य कोणत्याही देशात राहत असो, किंवा कोणत्याही शतकात जन्मास आला असो, महाकवीच्या सत्यमय रसाळ उद्गारामृताचे सेवन करण्यास तो योग्य असतो. काव्यापासून आनंद होण्याचे दुसरे कारण असे आहे की, साधारण मनुष्यास ज्या गोष्टी अव्यक्त असतात, त्या कवी त्यास व्यक्त करुन देतो. 'जितक्या मूर्ती तितक्या प्रकृती' अशी आपल्या लोकांत म्हण आहे. या म्हणीचा अर्थ इतकाच की, प्रत्येक मनुष्याचा स्वभाव निराळा असल्यामुळे सर्वांच्या स्वभावांचे ज्ञान होणे अशक्य आहे. तथापि ज्याअर्थी सर्व मनुष्यांस आपण 'मनुष्य' या एका वर्गाखाली मोडतो, त्या अर्थी त्या सर्वांत साधारण असे काही गुण असलेच पाहिजेत. या साधारण गुणांचे अति स्वल्पज्ञान बहुतेकांस असते; व ते असते म्हणून काव्यवाचनापासून त्यास आनंद होतो. कित्येक मनुष्य पराकाष्ठेचे रागीट असतात, कित्येक शांत असतात, कित्येक मायाळू असतात, कित्येक लोभी असतात, कित्येक क्रूर असतात,



Latest Sarkari Jobs, Govt Exam Results, Vacancies and updates on one click
Know More

कित्येक कामातुर असतात. तथापि राग, शांती, ममता, लोभ, क्रौर्य व काम इत्यादी सर्व मनोवृत्तींची प्रत्येकास थोडी बहुत ओळख असते. विशिष्ट व्यक्तींत एखादा गुण फार असला म्हणून बाकीच्या गुणांविषयी तो अगदी अज्ञान असतो असे नाही. प्रत्येक मनुष्य सर्व मनुष्यतेचे सूक्ष्म प्रतिबिंब आहे असे म्हणण्यास हरकत नाही. असे नसतेतर एकाचे मनोविकार दुसऱ्याला न समजते. साधारण मनुष्यात आणि कवींत भेद इतकाच आहे की, साधारण मनुष्यास ज्या प्रकृतिवैचित्र्याचे आणि विकार वैचित्र्याचे ज्ञान अगदी मंद असते, ते कवीस कल्पनासामर्थ्याने स्वत:सच स्पष्ट करुन घेता येते. इतकेच नाही, तर काव्य द्वारा ते दुसऱ्यासही स्पष्ट करुन देता येते. कवी हा कामरूपधारी पटाईत बहुरूपी आहे ! तो क्षणात राजा बनून सिंहासनस्थ पुरुषाच्या अंत:करणातील विचार बोलू लागतो; राजवेष घेऊन अर्धघटिका झाली नाही तो, तो वेष टाकून देऊन तो काळी पोशाख करतो, तोंडाला काजळ फासतो, वस्त्राखाली पाजळलेली शस्त्रे लपवून घेतो, आणि मध्यरात्रीच्या निबिड काळोखात जिकडे तिकडे सामसूम झाले असता द्रव्यासाठी कोणाचातरी जीव घेण्याचा बेत करीत मारेकरी होऊन बाहेर पडतो ! या स्थितीत पाचपन्नास पळे गेली न गेली तोती टाकून देऊन अभिसारिका बनतो व अभिसारिकेस योग्य असा पेहराव चढवून मेघांच्या गडगडाटांची, विजांच्या लखलखाटांची, किंवा तुफान वाऱ्याच्या सोसाट्याची पर्वा न करता, पावसाच्या मुसळधारेतून एका चेटासह विहारोद्यानातील नेमलेल्या लतामंडपात प्रियाची भेट घेण्यास जातो !

**46.** कवींच्या वाणीतील सत्ये कशी असतात ?

(A) देशकालादिकांनी मर्यादित नसलेली.

(B) देशकालादिकांनी मर्यादित असलेली.

(C) देशकालादिकांशी संबद्ध.

(D) देशकालाविषयी उदासीन.

**47.** कोणत्या मनोवृत्तींचा परिचय बहुतेक सर्व मनुष्यांस असतो ?

(A) अहिंसा, सत्य, अस्तेय, औदार्य, ममता

(B) राग, शांती, लोभ, क्रौर्य, काम

(C) प्रभुत्व, गुलामी, मत्सर, स्पर्धा, द्वेष

(D) भूक, तहान, वेदना, श्रम, मूर्च्छा

**48.** सामान्य मनुष्यापेक्षा कवीचे वेगळेपण कोणते ?

(A) प्रकृति वैचित्र्याविषयीची उत्सुकता, व शोधकता

(B) प्रकृति वैचित्र्याविषयी औदासिन्य व घृणा

(C) प्रकृति वैचित्र्याचे स्पष्ट ज्ञान व आविष्कार क्षमता

(D) प्रकृति वैचित्र्याचा अभाव व वैश्विकता

**49.** कवीने घेतलेल्या कोणत्या भूमिकांचा उल्लेख या उताऱ्यात केला आहे ?

(A) मध्यरात्र, मेघांचा गडगडाट, सोसाट्याचा वारा

(B) राजवस्त्रधारी, कृष्णवस्त्रधारी, विवस्त्र

(C) राजा, मारेकरी, चेट

(D) राजा, मारेकरी, अभिसारिका

**50.** या उताऱ्यात लेखकाच्या शैलीचा पुढील पैकी कोणता गुण प्रत्ययास येतो ?

(A) वाक्पटुता (B) संस्कृत प्रचुरता

(C) प्रासादिकता (D) दुर्बोधता



Latest Sarkari Jobs, Govt Exam Results, Vacancies and updates on one click
Know More

prepp

# Latest Sarkari jobs, Govt Exam alerts, Results and Vacancies

- Latest News and Notification
- Exam Paper Analysis
- Topic-wise weightage
- Previous Year Papers with Answer Key
- Preparation Strategy & Subject-wise Books

To know more **Click Here**

www.prepp.in